**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education


9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १४४ वा | मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ८० हून अधिक उमेदवार बिनविरोध आपल्या लोकशाहीला कोणता रोग झाला ?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विविध महापालिकांमधे पहिल्यांदाच फार मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडणूक होत आहे. राजकीय पक्षांच्या किंवा अपक्ष उमेदवारांनी आपली उमेदवारी काही कारणांमुळे मागे घेतल्याने सत्ताधारी राजकीय पक्षांचे अनेक उमेदवार निवडणुकीआधीच निवडून आल्याचे दिसून येत आहे. याबाबत निवडणूक आयोगाने अहवाल मागविला असला तरी या पद्धतीवर लोकशाही मानणाऱ्यांकडून तीव्र नापसंती व्यक्त केली जात आहे. तसेच ह्यनोटाह्व पयार्याने तर माघार घेतलेली नाही, मग निवडणूक बिनविरोध कशी? असा युक्तिवाद सोशल मीडियावर केला जात आहे.

त्यामुळे 'नोटा' पयार्याला घटनात्मक वैधता आहे का? नोटाबाबत कायदा किंवा या पयार्याला मिळालेल्या मतांचे पुढे काय? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. यावर आता घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत.



### आपल्या यंत्रणेत दोष आहे - बापट

मुंबई तक वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत उल्हास बापट म्हणाले, मी ५० वर्षांपासून संविधानाचा अभ्यासक आणि व्याख्याता राहिलो आहे. पण मी माझ्या आयुष्यात इतक्या मोठ्या प्रमाणात बिनविरोध निवडणूक झालेली पाहिली नाही. पण हे वरवरचे लक्षण वाटत असून आतला रोख काही वेगळाच असल्याचा मला संशय आहे. जसे की, एखाद्या व्यक्तीचे वजन कमी होत आहे, हे लक्षण असते. त्याला आतून कर्करोग झाल्याचे निदान होत असते. आपल्या लोकशाहीला कोणता रोग झाला आहे? हे पाहणे आवश्यक आहे.

### निवडणूक बिनविरोध कायदेशीर आहे?

'लोकप्रतिनिधित्व कायदा-१९५१' मध्ये बिनविरोध निवडणुकीबाबत कलम ५३ (२) मध्ये 'एकापेक्षा अधिक उमेदवार असल्यास प्रत्यक्ष मतदान घेण्या'ची तरतूद आहे. याचा अर्थ असा की, उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला जाहीर करता येते. लोकसभेत आजवर २७; तर विविध विधानसभांमध्ये २०० पेक्षा अधिक जण बिनविरोध निवडून आले आहेत.

### नोटाच्या अधिकारावर विचार व्हावा

निवडणुकीच्या रिंगणात एकच उमेदवार उरणार असून जर निवडणूक बिनविरोध होणार असेल तर मतदारांचा मतदानाचा अधिकार काढून घेतल्यासारखे होईल. मतदारांसाठी नोटाचा पर्याय असायला हवा. यासाठी विचारवंतांनी यावर विचार करण्याची गरज आहे, अशी अपेक्षा घटनातज्ज्ञ उल्हास बापट यांनी व्यक्त केली.

### NOTA बिनदाताचा वाघ

निवडणुकीत उभे राहण्याचा आणि माघार घेण्याचा अधिकार आहे, तसेच मतदान करण्याचा आणि न करण्याचाही अधिकार आहे. त्याला नोटा म्हटले जाते. नोटा हा बिनदातांचा वाघ आहे. नोटाला सर्वाधिक मते मिळाली तरी ज्या उमेदवाराला त्यानंतरची अधिक मते आहेत, तोच निवडून आला, असे मानले जाते. नोटा हा पर्याय आपण बाहेरच्या देशांतून घेतला. तिथे नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास निवडणूक पुन्हा घेतली जाते. तसेच त्या निवडणुकीतील उमेदवारांना पुन्हा निवडणुकीस उभे राहता येत नाही. अशा कडक तरतुदी इतर देशांत आहेत, त्यामुळे तिथे नोटाला महत्त्व आहे. लोकशाहीचा आत्मा जपणे महत्त्वाचे भारताबाबत बोलताना उल्हास बापट म्हणाले की, आपल्याकडे नोटाला फार महत्त्व नाही. अगदी दोन टक्क्यांच्या आसपास नोटाला मतदान होते. नोटाला अधिक मतदान झाल्यास पुन्हा निवडणूक झाल्याची उदाहरणे आपल्याकडे नाहीत. राज्यघटना हा लोकशाहीचा आत्मा आहे आणि तो जपण्यासाठी त्यात काही सुधारणा करणे अपेक्षित आहे. राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय, राज्यपाल, सभापती यांचे अस्तित्व आणि सार्वभौमत्व टिकवायचे असेल तर त्यांची विश्वासाहर्ता टिकवावी लागणार आहे.

## सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी गायकवाड तर उपाध्यक्षपदी सुरवसे यांची एकमताने निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील वाचनसंस्कृती, ग्रंथालय चळवळ आणि ज्ञानप्रसाराला नवी दिशा देणारी महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी पंढरपूर येथील ज्येष्ठ शिक्षक, समाजसेवक व ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते ज्योतीराम (जे. बी.) गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. ही निवड सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी करण्यात आली असून संपूर्ण कार्यकारी मंडळाची निवड बिनविरोध पार पडली.

ही निवड प्रक्रिया सलोख्याच्या व शांततापूर्ण वातावरणात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मधूकर भगरे यांनी काम पाहिले, तर लवाद म्हणून सौ. वैशाली मोरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या निवडणुकीत अध्यक्ष ज्योतीराम (जे.बी.) गायकवाड, उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, कार्यवाह साहेबराव शिंदे, सहकार्यवाह भास्कर कुंभार व खजिनदार सौ. सारिका माडीकर या पदाधिकाऱ्यांच्या निवड करण्यात आल्या.



### तसेच जिल्हा ग्रंथालय संघाच्या संचालकपदी

ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, हरिदास रणदिवे, जयंत आराध्ये, गुलाबराव पाटील, ग्रंथमित्र विजयकुमार पवार, ॲड. अनिल पाटील, शैलशिल्पा जाधव, अमोगसिद्ध कोळी, प्रमोद बेरे, विनोद गायकवाड, सारिका मोरे, धोंडीबा बंडगर, प्रकाश शिंदे, सोमनाथ खडतरे, विलास कदम आणि सुप्रिया किरनाळे यांची निवड करण्यात आली.

निवडणूक प्रक्रियेच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुलाबराव पाटील यांनी केले. जिल्हा ग्रंथालय चळवळीचा इतिहास, आजवर झालेली वाटचाल आणि भविष्यातील उद्दिष्टे त्यांनी आपल्या भाषणातून मांडली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनसर शेख यांनी मानले.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील ग्रंथालयप्रेमी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये सौ. वृषाली हजारे, सौ. दिपाली नरखेडकर, सौ. मेघा मिसाळ, मच्छिंद्र लेंडवे, शौकत पटेल, रवी गाजरे, तानाजी जाधव, एकनाथ गुरव, सुरेश शिंदे, मदणे, महाराज भोसले हरि, दिलीप भोसले, संजय चव्हाण, नाना धांडूरे, गाडेकर, सुधाकर घाडगे, बाळासाहेब शिंदे, मल्लिकार्जुन एलमार, अनिल कुचेकर, पाटील सर, गोफणे सर, झांबरे सर, बामणे सर यांच्यासह अनेक ग्रंथालय चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर बोलताना ज्योतीराम गायकवाड यांनी सर्व पदाधिकारी, संचालक व उपस्थितांचे आभार मानले. 'जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील ग्रंथालय सक्षम करणे, ग्रामीण व शहरी भागात वाचनसंस्कृती वाढवणे, युवक व विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडे आकर्षित करणे आणि बंद पडलेली ग्रंथालये पुन्हा कार्यान्वित करणे, हा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

गायकवाड सर हे गेल्या अनेक वर्षांपासून ग्रंथालय चळवळीत सक्रिय असून, त्यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथालय संघ अधिक प्रभावीपणे कार्य करेल, वाचनसंस्कृतीला चालना मिळेल आणि ज्ञानप्रसाराचे कार्य अधिक व्यापक होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## प्रभाग क्रमांक ४ मधून सी. ए. सुशिल बदपट्टे यांचा झंझावाती प्रचार; 'शब्द दिला की पूर्ण करणार'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून, प्रभाग क्रमांक ४ मधून शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अधिकृत उमेदवार सी. ए. सुशिल बदपट्टे यांनी आपल्या प्रचाराची झंझावाती सुरुवात केली आहे. 'शहराच्या प्रगतीचे घड्याळ आता नव्या वर्षात अधिक जोमाने आणि अचूक वेळेसह धावायला लागेल,ह्व असा विश्वास व्यक्त करत बदपट्टे यांनी विकासकेंद्री राजकारणावर भर देण्याची ग्वाही दिली.



प्रचाराच्या प्रारंभीच बदपट्टे यांनी मतदारांशी संवाद साधताना स्पष्ट भूमिका मांडली. ह्लमी खोटे आश्वासन देणार नाही. एकदा शब्द दिला की तो पूर्ण केल्याशिवाय माघार घेणार नाही,' असे ठाम विधान त्यांनी केले. त्यांच्या या भूमिकेला प्रभागातील नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

**(पान 2 वर..)**

## सोलापूर जिल्हा शै.कला शिक्षक संघाचा जीवनगौरव व आदर्श कलाशिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कला शिक्षक संघ शैक्षणिक कला शिक्षक सोलापूर यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेला जीवनगौरव पुरस्कार, आदर्श कलाशिक्षक पुरस्कार, कलाप्रेमी पुरस्कार तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षर व रंगभरण स्पर्धांचा बक्षिस वितरणाचा भव्य सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कला क्षेत्रातील योगदानाचा गौरव करणे व विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष शेरशाह डोंगरी यांनी अध्यक्षीय मनोगतात त्यांनी सांगितले की, 'कला शिक्षक हे समाजाच्या सांस्कृतिक विकासाचे शिल्पकार असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासात कलेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.ह्व

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार दत्तात्रय सावंत उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात कला शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक केले. यावेळी शैक्षणिक कला संघटनेच्या वतीने माजी आमदार दत्तात्रय सावंत सरांना कला शिक्षकांशी संबंधित विविध





मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

### या मागण्यांमध्ये पुढील प्रमुख मुद्द्यांचा समावेश होता -

१) कला शिक्षकांची नियुक्ती करताना विद्यार्थी पट संख्या पूर्वी प्रमाणे विचारात घ्यावी.

२) शासकीय रेखाकला परीक्षा, मूल्यमापन प्रक्रिया व निकाल याच्या पद्धतीत सुधारणा करणे.

३) शासकीय रेखाकला परीक्षा - एलिमेंटरी व इंटरमिजिएट साठी सोलापूरात स्वतंत्र मूल्यमापन केंद्र मिळावे.

या मागण्यांवर सकारात्मक विचार करून योग्य पाठपुरावा करण्याचे आश्वासन माजी आमदार दत्तात्रय सावंत सरांनी दिले.

कार्यक्रमात कला क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान दिलेल्या ज्येष्ठ कलाशिक्षकांना कला शिक्षक जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जीवनगौरव पुरस्कार, जिल्हास्तरीय आदर्श कला शिक्षक व कलाप्रेमी पुरस्कार प्राप्त कला शिक्षकांची नावे

सोलापूर जिल्ह्यातून ज्ञानेश्वर निवृत्ती कांबळे (सेवानिवृत्त कलाशिक्षक) यांना जीवनगौरव पुरस्कार तर महेश सूर्यकांत छत्रबंद, सुवर्णा मल्लिनाथ भुसने, शोभा सोमनगौडा बिरादार, नागराज चंद्रकांत रमणशेटटी यांना जिल्हास्तरीय आदर्श कलाशिक्षक पुरस्कार २०२६ व नंदकुमार चंद्राम विजापूरे, विजया अजिंक्य मोरे, गीता तायप्पा पवार, सुनिता किसन घाडगे, मधुरा मिलिंद छत्रे यांना कलाप्रेमी पुरस्कार २०२६ देऊन गौरविण्यात आले. संघटनेच्या वतीने विशेष पुरस्कार म्हणून जिल्हाध्यक्ष शशिकांत सदाफुले सर यांना गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रम, मा. दत्तात्रय सावंत, (माजी शिक्षक आमदार, विभाग पुणे.), मा. पंडित भिमण्णा जाधव, (आंतरराष्ट्रीय सुंद्रीवादक) प्राचार्य राम अप्पाराव ढाले, (एस. व्ही.सी.एस. हायस्कूल, भवानी पेठ, सोलापूर), मा. शांतय्या गुरय्या स्वामी, (सचिव, श्री बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर) मा. सुधीर बसवंत भरले, प्राचार्य नितीन झाडबुके, (बसवेश्वर माध्य. व उच्च माध्य. विद्यालय निंबर्गी), मा. शेरशहा डोंगरी, **(पान 2 वर..)**



# विकसित सोलापूरच्या स्वप्नपूर्तीसाठी १०२ उमेदवारांना विजयी करा - प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

## भाजपाचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिकेची ही निवडणूक सोलापूरचे भविष्य ठरवणारी निवडणूक आहे. त्यामुळे भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपाच्या सर्व १०२ उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत सोमवारी जुळे सोलापुरातील जामगोंडी मंगल कार्यालयात कार्यकर्ता मेळावा उत्साहात झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, भाजपाच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, भाजपा पूर्व जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, पश्चिम जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, माजी शहर अध्यक्ष रामचंद्र जन्नू, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे, शिवराज सरतापे, सुधा अळीमोरे, भारतीय जनता युवा मोचार्चे शहर अध्यक्ष विजय कुलथे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून भारतीयांनी २०४७ साली विकसित भारताचे स्वप्न पाहिले आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पार्टीला 'शत प्रतिशत' च्या दिशेने घेऊन जाणे आवश्यक आहे. विकसित भारताच्या पर्यायाने विकसित सोलापूरच्या जडणघडणीत सोलापूर महानगरपालिकेतील नगरसेवकांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विचारांनी चालणारी सत्ता सोलापुरातही आणायची आहे.

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आपल्या प्रभागामध्ये दररोज १० तास पक्षासाठी देऊन प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडावी. केंद्र सरकारच्या तसेच राज्य सरकारच्या योजना मतदारांपर्यंत जाऊन त्यांना सांगाव्यात. आणि कमळ चिन्हाला पर्यायाने भाजपाला मतदान करण्याचे आवाहन करावे. शहरातील प्रत्येक मतदान केंद्रावर ५०% हून अधिक मते भारतीय जनता पार्टीला मिळवण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

भारतीय जनता पार्टी हा कार्यकर्त्यांच्या समर्पणातून तयार झालेला पक्ष आहे. या पक्षातील अनेक कार्यकर्त्यांच्या महत्त्वकांक्षा आहेत. ज्यांना या निवडणुकीत संधी मिळाली नाही त्यांना आगामी काळात केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच सोलापूर महानगरपालिकेत विविध ठिकाणी संधी मिळू शकते. त्यामुळे उमेदवारी न मिळालेल्या प्रामाणिक कार्यकर्त्यांनी नाराज न होता ज्यांना उमेदवारी मिळाली आहे अशा भाजपाच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

आमदार विजयकुमार देशमुख म्हणाले, यंदाच्या सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या सर्व उमेदवारांना निवडून आणू. २०१७ च्या तुलनेत रेकॉर्डब्रेक जागा या निवडणुकीतून निवडून येतील. कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले काम जनतेपर्यंत पोहोचवावे, असेही आमदार विजयकुमार देशमुख यांप्रसंगी म्हणाले.

आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, सोलापूरच्या दररोजच्या पाणी पुरवठ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केलेली ८९२ कोटी रुपयांची योजना, आयटी पार्क ला मंजुरी, सोलापूरहुन मुंबई आणि गोव्याला सुरू झालेली विमानसेवा आणि प्रस्तावित असलेली तिरुपती, बंगळुरू विमानसेवा, पुढील १०० दिवसांत सुरू होणाऱ्या १०० ई बस अशा विकास कामांमुळे सोलापूरकरांचा भाजपला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. भाजपाचे शहरातील सर्व कार्यकर्ते दिवस रात्र एक करून सर्व १०२ उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रयत्न करतील, असेही आमदार देवेंद्र कोठे यांप्रसंगी म्हणाले.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर चौंडेश्वरवाडी येथे संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २० डिसेंबर २०२५ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत मौजे चौंडेश्वरवाडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या शिबिराअंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्वच्छता, महिला मेळावा, आरोग्य तपासणी शिबिर, पशुचिकित्सा शिबिर, जलसंधारणासाठी बंधाऱ्याची उभारणी, स्मशानभूमी स्वच्छता, वृक्षदिंडी, वृक्षारोपण, हळदी कुंकू व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. या शिबिरात महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सयाजीराजे मोहिते पाटील, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.राजेंद्र वडजे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर, साहित्यिक प्रशांत सरूडकर, प्रा.महादेव तळेकर, डॉ. अपर्णा मुळे, प्रा. धनंजय देशमुख, डॉ. अनिल लोंढे आदी वक्त्यांनी शिबिरार्थी विद्यार्थी विद्यार्थिनी व गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. या शिबिरात आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की,"जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे, त्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करीत रहा. जीवनात आनंदी राहण्यासाठी कोणता तरी एक छंद किंवा कला जोपासणे गरजेचे आहे".

या शिबिराचा समारोप समारंभ आज संपन्न झाला. यांप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. विश्वनाथ आवड हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून अकलूज पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक करिष्मा वणवे या उपस्थित होत्या. यांप्रसंगी मौजे चौंडेश्वरवाडीच्या सरपंच सौ. अलका इंगवले देशमुख, उपसरपंच प्रशांत मोहिते, बाळासाहेब देशमुख, शिवाजीराव इंगवले देशमुख, संताजीराव माने देशमुख, डॉ.बाळासाहेब मुळीक, प्रा.स्मिता पाटील, प्रा.एकनाथ बोडके, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक करिष्मा वनवे आपल्या मनोगतात म्हणाल्या की," विद्यार्थी जीवनात आयुष्याचा पाया घडवण्यासाठीचे संस्कार या स्वरूपाच्या शिबिरामधून दिले जातात. हे क्षण जीवनात कधीच विसरले जात नाहीत. यशस्वी होण्यासाठी आपले ध्येय निश्चित करा व प्रयत्नपूर्वक ते मिळवा". डॉ. विश्वनाथ आवड यांनी विद्यार्थ्यांना रचनात्मक कामाचे महत्त्व स्पष्ट करून, शिबिरातून विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या संस्कार शिदोरीचे कौतुक केले. शिवाजीराव इंगवले देशमुख यांनी मोहिते पाटील परिवार व अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाने संपूर्ण परिसरात केलेल्या भरीव कायार्चा आढावा घेतला. सायली मदने व सत्यजित देशमुख या शिबिरार्थीची मनोगते झाली. कार्यक्रमाधिकारी प्रा. दत्तात्रय मगर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विजयकुमार शिंदे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.सज्जन पवार यांनी आभार मानले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.


## जाहिर समन्स

कि. अर्ज नं. /२०२६ नि.

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

मिरासाहब इसाक पाटील,
वय–२९ वर्षे, धंदा– मजुरी,
रा.अरबळी,ता.मोहोळ,जि.सोलापूर. } **अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत अरबळी,
ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदाराचा मुलगा अरहान मिरासाहब पाटील हा मौजे अरबळी, ता. मोहोळ येथे अर्जदाराचे राहते घरी दि.१७/०२/२०१९ रोजी जन्मलेला आहे. त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत अरबळी, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराचा मुलगा अरहान मिरासाहब पाटील याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत अरबळी चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदाराचा मुलगा अरहान मिरासाहब पाटील याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत अरबळी यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत अथवा दि.२३/०१/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे.ता.०६/१/२०२६

**लिपिक** (शिक्का) **तहसिलदार, मोहोळ**


# आयुक्त डॉ. ओम्बासे यांची कचरा संकलन केंद्राची पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिकेच्या शहर विकास व नागरी सुविधा बळकटीकरणाच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज जुळे सोलापूर परिसरातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या व प्रस्तावित कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी रूपा भवानी चौक, लेप्रसी कॉलनी, जुळे सोलापूर येथे नागरिकांच्या सोयीसाठी नवीन रॅम्प तयार करण्यात येत असून, त्या कामाची पाहणी आयुक्तांनी केली. रॅम्पचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करावे, तसेच अधिक सुरक्षित व सुलभ वापर होईल, याची विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

तसेच इंद्रधनु येथील कचरा संकलन केंद्रात नवीन शेड उभारण्यात येणार असून, त्या प्रस्तावित कामाचीही आयुक्तांनी पाहणी केली. कचरा संकलन व व्यवस्थापन प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध, स्वच्छ व पावसाळ्यातही सुरळीतपणे चालू राहण्यासाठी शेड उभारणी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या ठिकाणी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा व कामाच्या सोयींचा विचार करून कामाचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.

शहरातील मूलभूत सुविधा सुधारणा, स्वच्छता व्यवस्था व नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित कामांना महापालिकेच्या वतीने प्राधान्य देण्यात येत असून, कामांचा दर्जा व वेळेची पूर्तता यावर विशेष भर देण्यात येत असल्याचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यावेळी स्पष्ट केले.

या पाहणी सह. आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे दरम्यान संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

**एस.आर.एन.क्रमांक:–** SLP/04027/18/25
**फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक** १६१९/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक राहत चॅरिटेबल ट्रस्ट अकलूज बाबत।
न्यासाचा पत्ता :- ८३/४/२ प्रतापसिंह चौक ऑफ फुले नगर ३ समोर, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर सोलापूर, माळशिरस,अकलूज (सीटी) } **अर्जदार**
अर्जदार- वाहिद अहमद बागवान,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Trust Fund | १००००.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १००००/- मात्र (अक्षरी रुपये दहा हजार मात्र फक्त)

स्थावर मिळकत(वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. /- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. ल्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ०६-०१-२०२६ रोजी दिली.

(कोर्टाचा शिक्का) **अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर**


# सर्जनशील माध्यमातून मतदान जनजागृती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर 'प्रत्येक मताचे महत्त्व' नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेमार्फत सर्जनशील व लोकसहभागात्मक पद्धतीने विविध मतदान जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या एन.यू.एल.एम. (National Urban Livelihoods Mission) अंतर्गत कार्यरत असलेल्या महिला बचत गटांच्या माध्यमातून शहरातील प्रमुख ठिकाणी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सदर उपक्रमांमध्ये ६०० महिला बचत गट सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे. शहरातील २५ प्रमुख ठिकाणी बैठका, संवाद सत्रे, जनजागृती कार्यक्रम आयोजित करून नागरिकांना मतदानाचा हक्क, त्याचे महत्त्व तसेच लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमांदरम्यान उपस्थित महिलांना मतदान करण्याची शपथ देण्यात येऊन त्यांनी इतर नागरिकांनाही मतदानासाठी प्रवृत्त करण्याचा संकल्प केला. महिला बचत गटांच्या सशक्त सहभागामुळे मतदान जनजागृतीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले असून, आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यास हे उपक्रम मोलाचे ठरणार आहेत, असा विश्वास सोलापूर महानगरपालिकेमार्फत व्यक्त करण्यात आला आहे.

अशा प्रकारे विविध माध्यमातून मतदान जनजागृती चे काम सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने हाती घेण्यात आले आहे.
15 जानेवारी 2026 रोजी,
वार – गुरुवार रोजी
वेळ – सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30

सोलापूरकरांनी शंभर टक्के मतदान करण्याचे व आपला मतदानाचा हक्क व कर्तव्य बजावणीचे आवाहन डॉ. सचिन ओम्बासे. आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांनी केले आहे.

# नेताजी खंडागळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा भव्य शुभारंभ



**बोरामणी (कटूसत्य वृत्त):–** नेताजी खंडागळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ तसेच त्यांच्या सामाजिक व विकासात्मक कार्यावर आधारित कॅलेंडरचे अनावरण मोठ्या उत्साहात व जनसहभागातून पार पडले. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली.

या प्रसंगी भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष महेशदादा बिराजदार, सरपंच राज साळुंखे, सोसायटी चेअरमन भारत कवडे, सोसायटी चेअरमन वजीर मुजावर, माजी सरपंच राजू हलसगे, कमलाकर भोसले, लहुजी सेना अध्यक्ष सुधाकर पाटोळे, माजी सरपंच माणिक नन्नवरे, किसन मस्के, लक्ष्मण जाधव, नागनाथ बिराजदार, अतुल कवडे, मल्लिनाथ पटणे, नितीन माशाळे, दिलीप आचलारे, अभिमन्यू भगरे, वैभव हलसगे, नाना भोसले, रतन शिंदे, विलास वाघमारे, अतुल आवटे, माऊली वाघमारे, गौतम गायकवाड, बालाजी पवार, संजय पवार, अमित मोरे, संजय पाटील, विशाल शिंदे, नागेश सुरवसे, उपसरपंच हणमंत सरडे, नितीन मोहिते, संतोष स्वामी यांच्यासह माजी व विद्यमान लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच बोरामणी-मुस्ती, उळेझ्र कासेगाव पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी नेताजी खंडागळे यांच्या सामाजिक बांधिलकीचे, लोकाभिमुख कायार्चे व विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी, नागरिकांच्या समस्या ऐकून त्या सोडवण्यासाठी तसेच विकासाभिमुख उपक्रम राबवण्यासाठी हे जनसंपर्क कार्यालय एक महत्त्वपूर्ण केंद्र ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी अनावरण करण्यात आलेल्या कॅलेंडरमध्ये नेताजी खंडागळे यांनी विविध क्षेत्रांत केलेल्या कामांचा आढावा देण्यात आला असून, त्यातून त्यांच्या कार्याची दिशा व ध्येय स्पष्टपणे दिसून येते, अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी दिली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कार्यकर्ते व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात व लोकसहभागातून पार पडला.


## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**–: संपर्क :–**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# जाहिरातींचे प्रमाणीकरण करूनच प्रसारण करण्याचे आवाहन


**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५झ्र२६ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निवडणूक कालावधीत प्रसारित होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींचे माध्यम प्रमाणन (Media Certification) करणे बंधनकारक आहे.

या अनुषंगाने सोलापूर शहरातील नॉर्थ कोर्ट, सोलापूर येथे माध्यम प्रमाणन कक्ष (मीडिया कक्ष) कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षामार्फत निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध माध्यमांवरील जाहिरातींचे प्रमाणीकरण करण्यात येत आहे.

निवडणूक प्रचारासाठी रिक्षा, वाहनांवर लावले जाणारे ऑडिओ संदेश, तसेच स्थानिक केबल/लोकल वृत्तवाहिन्यांवर प्रसारित करण्यात येणाऱ्या जाहिराती, बातम्या, स्क्रोल, ऑडिओ-व्हिडिओ स्वरूपातील प्रचार साहित्य हे सर्व प्रसारण करण्यापूर्वी संबंधित उमेदवार, राजकीय पक्ष अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी माध्यम प्रमाणन कक्षामधून पूर्वपरवानगी व प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. प्रमाणीकरणाशिवाय कोणत्याही प्रकारचे ऑडिओ, व्हिडिओ किंवा जाहिरातींचे प्रसारण केल्यास ते आचारसंहितेचा भंग मानले जाईल.

अशा प्रकरणांची नोंद घेऊन संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तरी सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, प्रचार प्रमुख, जाहिरात संस्था, वाहन चालक व स्थानिक माध्यमांनी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि नियमांचे पालन करण्यासाठी नॉर्थ कोर्ट येथील माध्यम प्रमाणन कक्षामधून जाहिरातींचे प्रमाणीकरण करूनच प्रसारण करावे, असे आवाहन सोलापूर महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे. याबाबत सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे म्हणाले की, 'निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता व निष्पक्षता राखण्यासाठी माध्यमांवरून प्रसारित होणाऱ्या सर्व जाहिरातींचे प्रमाणीकरण आवश्यक आहे. रिक्षा व वाहनांवरील ऑडिओ प्रचार तसेच स्थानिक वृत्तवाहिन्यांवरील जाहिराती माध्यम प्रमाणन कक्षातून मंजूर करूनच प्रसारित कराव्यात. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर निवडणूक आचारसंहितेनुसार कारवाई करण्यात येईल.'

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 143

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# अमोल बापू शिंदे यांच्या प्रचाराला उत्स्फूर्त सुरुवात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मधून शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे, युवानेते अनिकेत पिसे, मनोरमा सपाटे व मनिषा कणसे यांच्या प्रचाराचा श्रीगणेशा भव्य पदयात्रेने करण्यात आला. या पदयात्रेस युवक व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

थोरला मंगळवेढा तालीम येथे श्री गणेश पूजनाने पदयात्रेची सुरुवात झाली. या पदयात्रेत शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, कामगार सेना, विधी सेवा समिती तसेच अंगीकृत सर्व संघटनांचे पदाधिकारी, शिवसैनिक, थोरला मंगळवेढा तालीमचे सदस्य, संकेत परिवार व अमोल बापू शिंदे मित्रपरिवार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

ही पदयात्रा पिंपळा मारुती नवजवान गल्ली, माळी गल्ली, काळी मशीद, बाजीअण्णा मठ, पत्रा तालीम, सळई मारुती, गवंडी गल्ली, मल्लिकार्जुन मंदिर परिसर, कुंभारवाडा, पंजाब तालीम व चौपाड या भागांतून मार्गक्रमण करत गेली.

रॅलीदरम्यान विविध ठिकाणी अमोल बापू शिंदे व सर्व उमेदवारांचे औक्षण करून नागरिकांनी शुभेच्छा दिल्या.

पुष्पहार, पुष्पगुच्छ व पेढे भरवून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. 'एकनाथ शिंदे जिंदाबाद', 'शिवसेना जिंदाबाद' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

आपण केलेल्या विकासकामांची पावती सुज्ञ मतदार राजा नक्कीच देईल, तसेच लाडक्या बहिणी ठामपणे आपल्या पाठीशी उभ्या राहतील, असा विश्वास अमोल बापू शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. युवक व महिलांकडून रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळाला.या पदयात्रेत ज्ञानेश्वर सपाटे, संकेत भाऊ पिसे, प्रकाश अवस्थी, पृथ्वीराज दीक्षित कणसे यांच्यासह शिवसेना तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी भयभीत होऊ नये- सपोनि परजणे



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):–** माळशिरस तालुक्यातील मांडवे परिसरातील एका शाळेत तीन वर्षाच्या मुलाला चॉकलेट देऊन ओमनी वाहनातून पळवून नेल्याची बातमी काही वृत्तपत्रे व सोशल मीडियावर प्रसारित झाली होती. मात्र या प्रकरणी नातेपुते पोलीस ठाण्यात कोणतीही तक्रार दाखल झालेली नसल्याचे व मुलाच्या म्हणण्यात तथ्य नसल्याने नातेपुते व परिसरातील शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक यांनी भयभीत होऊ नये असे आवाहन नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी नातेपुते पोलीस ठाणे येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले.

दिनांक ४ जानेवारी रोजी मांडवे ता. माळशिरस येथील एका शाळेतील चॉकलेटचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांच्या अपहरणाचा प्रयत्न अशी बातमी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाली होती सदर बातमीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरल्याने नातेपुते पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संबंधित शाळेत भेट देऊन मुख्याध्यापक व तेथील शिक्षिकांशी चर्चा केली. यावेळी संबंधित घटनेबाबत सखोल चौकशी करण्यात आली असता मुलाच्या म्हणण्यात तथ्य नसल्याचे निदर्शनास आले.

पोलीसांनी शाळेतील सर्व शिक्षकांची बैठक घेऊन अशा कोणत्याही घटना घडल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे तसेच अफवा पसरवू नयेत, अशी सूचना केली. सोशल मीडियावर चुकीची माहिती प्रसारित करू नये, असे आवाहन सपोनी महारुद्र परजणे यांनी केले आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती माळीनगर येथे उत्साहात साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, ज्ञानज्योती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती माळीनगर येथे शनिवारी सकाळी १० वा.विविध संस्थांच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या विश्रामगृहा समोरील क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अधार्कृती पुतळ्यास साखर कारखान्याच्या नूतन इंडिपेंडेंट डायरेक्टर किशोरी चवरे व शिक्षिका सविता पांढरे, वैशाली पांढरे, सुप्रिया झगडे, वैशाली बनकर,निशा दळवी, सुवर्णा पोळ, मेघा जोशी,आशा रानमाळ, सुखदा विधाते, कीर्तीमाला पांढरे, संध्याराणी दुनाखे, सपना भेंडीगिरी,सौ. लोखंडे व उपस्थित महिला व मुलींच्या हस्ते पुष्पहार व पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

तसेच यावेळी कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे,संचालक राहुल गिरमे, मोहन लांडे,विशाल जाधव, मुरलीधर राऊत, शुगरकेन सोसायटीचे व्हा.चेअरमन कपिल भोंगळे, संचालक जयवंत चौरे, नामदेव आगम,दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे, संचालक पृथ्वीराज भोंगळे, दिलीप इनामके, म.फुले पतसंस्थेचे व्हा.चेअरमन महादेव एकतपुरे, कृष्णा भजनावळे, भागधारक गौतम गिरमे, मिलिंद गिरमे, घनश्याम भोंगळे,अनिल झगडे, निलेश एकतपुरे, मॉडेल हायस्कुलचे प्राचार्य कलाप्पा बिराजदार, उपप्राचार्य रितेश पांढरे, माजी प्राचार्य प्रकाश चवरे, माहिती व जनसंपर्क अधिकारी अनिल बनकर, एज्युकेशन सोसायटीचे सर्व विभागाचे शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी तसेच सर्व समाज बांधव,व्यापारी वर्ग, कारखान्याचे सभासद, भागधारक, शेतकरी, अधिकारी वर्ग, खाते प्रमुख व कर्मचारी, ग्रामस्थ आणि माळीनगरच्या विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार व पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी कारखान्याचे वतीने उपस्थित महिला व मुलींना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील पुस्तके वाटण्यात आली.

# मराठी पत्रकार संघाच्या शहराध्यक्षपदी सर्वगोड यांची निवड



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्य सचिव हरिभाऊ प्रक्षाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि.3 जानेवारी 2026 रोजी ठिक 11/30 वाजता प्रथम श्री विठ्ठलाच्या प्रतिमेचे व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन व त्यांना अभिवादन करून मराठी पत्रकार संघाच्या नूतन पंढरपूर कार्यकारणी निवडीबाबत येथील पत्रकार भवन येथे बैठक पार पडली.

यामध्ये मराठी पत्रकार संघाच्या पंढरपूर शहराध्यक्षपदी दैनिक एकमतचे तालुका प्रतिनिधी अपराजित सर्वगोड तर तालुका अध्यक्षपदी दैनिक पुण्यनगरीचे मिलिंद यादव यांची सवार्नुमते निवड करण्यात आली.

या वेळी शहर व तालुक्यातील पत्रकारांची मराठी पत्रकार संघाच्या विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली.असून पंढरपूर येथे उभारण्यात येणाऱ्या मीडिया टावर, पत्रकारांच्या अडचणी समस्या सोडवण्या बाबत तसेच विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

मराठी पत्रकार संघाच्या नूतन कार्यकारणी मध्ये शहर उपाध्यक्ष अमोल माने,दगडु कांबळे, शहर सचिव दत्ता पाटील, शहर कार्याध्यक्ष रामकृष्ण बिडकर, शहर खजिनदार सचिन माने, शहर प्रसिद्धी प्रमुख कबिर देवकुळे यांची निवड करण्यात आली तर पंढरपूर तालुका उपाध्यक्ष बालम मुलानी, तालुका कार्याध्यक्ष अमोल कुलकर्णी, तालुका सचिव अरुण जाधव, तालुका खजिनदार सावता जाधव, तालुका प्रसिद्धीप्रमुख विनोद पोतदार यांची सवार्नुमते निवड करण्यात आली.

याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ शहापूरकर, पत्रकार कल्याण कुलकर्णी, विकास पवार, संजय कोकरे, राजेंद्र ढवळे, सागर आतकरे, नवनाथ खिलारे, अमोल गुरव, नेताजी शिंदे, संतोष चंदनशिवे, प्रकाश सरताळे, संतोष कसगावडे, संजय यादव, प्रदीप आसबे यांच्यासह मराठी पत्रकार संघाचे पत्रकार बांधव उपस्थित होते.

# सत्तेसाठी भाजपकडून जीव घेण्याचे कटकारस्थान - खासदार प्रणिती शिंदे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** भारतीय जनता पक्ष सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्यास तयार असून, आता निवडणुका जिंकण्यासाठी सामान्य कार्यकर्त्यांच्या जीवावर उठण्यापर्यंत भाजपची मजल गेली आहे, असा गंभीर आरोप खा. प्रणिती शिंदे यांनी केला. पैसा आणि सत्ता अपुरी पडल्यावर भाजपने कार्यकर्त्यांच्या रक्तावर राजकारण करण्याचा मार्ग स्वीकारला असल्याचा घणाघाती हल्लाबोल त्यांनी केला.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांची शुक्रवारी निर्घृण हत्या झाली होती. या रक्तरंजित राजकारणाच्या निषेधार्थ रविवारी पार्क चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर विविध राजकीय पक्षांच्या वतीने मूक आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात कॉंग्रेस, शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी माकपचे नेते व माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) शहराध्यक्ष महेश गादेकर, माजी अध्यक्ष भारत जाधव, मनसेचे नेते दिलीप धोत्रे, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, जितेंद्र टेंभुर्णीकर, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख यांच्यासह प्रशांत इंगळे, प्रताप चव्हाण, प्रशांत बाबर, चंद्रकांत पवार, प्रमिला तुपलवंडे, हेमा चिंचोळकर, सुमन जाधव, व्यंकटेश कोंगारी, दत्ता गणेशकर, नलिनी कलबुर्गी आदी उपस्थित होते.

मूक आंदोलनानंतर बोलताना खा. प्रणिती शिंदे म्हणाल्या, 'लोकशाही आणि संविधानाची सातत्याने पायमल्ली होत आहे. या अन्यायाविरोधात आम्ही शांततेच्या मागार्ने निषेध नोंदवला आहे. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी, जनतेची सेवा करण्यासाठी भाजपच्या राक्षसी प्रवृत्तीविरोधात आमची लढाई सुरूच राहणार आहे.'

# अखिल भारतीय त्रिमूर्ती चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेचे आयोजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर -अकलूज येथे दिनांक १२,१३ व १४ जानेवारी २०२६ या कालावधीत अखिल भारतीय त्रिमूर्ती चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेर्चे आयोजन केले आहे.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याच्या कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी जयंती समारंभ समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, अकलूज नगरपरिषदेचे नूतन नगरसेवक व स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील प्रमूख उपस्थित होते.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली सदरच्या स्पर्धा संपन्न होत आहेत.

सयाजीराजे मोहिते पाटील म्हणाले, स्पर्धेचे हे ४७ वे वर्ष आहे. स्पर्धेत महाराष्ट्रासह परराज्यातील राष्ट्रीय स्तरावरील मल्ल सहभागी होतात. सुमारे ७५० पेक्षा अधिक मल्ल यावर्षी स्पर्धेत सहभागी होतील. त्रिमुर्ती केसरी कुस्ती स्पधेर्साठी खुल्या गटाकरिता प्रथम क्रमांकाचे बक्षिस त्रिमूर्ती केसरी चषक व दोन लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी दिड लाख रुपये, तृतिय क्रमांकासाठी एक लाख रुपये व चतुर्थ क्रमांकासाठी पन्नास हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आले आहे. तर वजनी गटासाठी २५ ते ८५ किलो पर्यंत एकूण १५ गटानुसार विजेत्या व पराजित मल्लांनाही भव्य बक्षीस दिली जातात.

वसंतराव जाधव म्हणाले, दि.१२ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत मल्लांनी आपली वजने शिवतिर्थ आखाड्यात द्यावीत.दि१२ रोजी सायंकाळी ४ वाजता समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील व स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून दि.१४ रोजी सायंकाळी ६ वाजता स्पधेर्चा बक्षीस समारंभ राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व आ. उत्तमराव जानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या वेळी प्रताप क्रीडा मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील, सचिव बिभीषण जाधव, अरविंद वाघमोडे, दादासाहेब कोकाटे, उमेश भिंगे, बाळासाहेब सावंत, रामचंद्र मिसाळ, सुहास थोरात, सतीश शेखर आदी मान्यवर उपस्थित होते.

# वीरतपस्वी शिक्षण संकुल येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** वीरतपस्वी शिक्षण संकुल विडी घरकुल, कुंभारी येथे मुख्याध्यापक अमोघ सिद्ध कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिकचे मुख्याध्यापक मल्लिकार्जुन पाटील होते. प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय सुतार यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उलगडून सांगितला. तर ज्येष्ठ शिक्षक पंचया स्वामी व वैशाली डांगे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कायार्चे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. प्रास्ताविक लक्ष्मी पाटील यांनी केले. सूत्रसंचालन मोनिका माळगे तर अश्विनी पडनूरकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संकुलातील सर्व शिक्षक- शिक्षिक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत एन. बी. नवले सिंहगड महाविद्यालयाचे यश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सावित्रीबाई एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथील विद्यार्थ्यांनी अविष्कार २०२५ या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे.

शुद्ध विज्ञान या विभागात कु. समीक्षा यरपूल हिने विद्युत वितरण व्यवस्थेमध्ये प्रारंभिक विद्युत प्रवाहातील धक्के कमी करण्यासाठी बुद्धिमान फीडर स्विचिंग प्रणाली या संशोधन प्रकल्पासाठी प्रथम पारितोषिक मिळवले. या प्रकल्पासाठी तिला प्रा. अनंतराव पाटील व प्रा. अनिल कोटमाळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या विभागात कु. यश राज पाटील याने स्मार्ट कृषी यंत्रमानव या नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी तृतीय पारितोषिक पटकावले. समारोप प्रसंगी उद्योजक राम रेड्डी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. या प्रकल्पासाठी प्रा. शशिकांत लामकाने, सुमेध पाठक आणि श्रीकांत जगताप यांनी मार्गदर्शन लाभले. अविष्कार २०२५ या स्पर्धेसाठी सिंहगड महाविद्यालयाचे प्रा. सुनील शाखापुरे यांनी समन्वयक म्हणून उत्कृष्ट नियोजन व कार्य केले. या यशाबद्दल कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, प्राध्यापक वर्ग व सर्व कर्मचारीवृंद यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. भविष्यातही संशोधन, नवोपक्रम व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अशीच भरीव कामगिरी घडावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# पुणे-सोलापूर महामार्गावर भीषण अपघात

## मोटरसायकलवरील तिघांचा मृत्यू

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीतील मौजे वेणेगाव शिवारात पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर आज रविवार (दि. ४ जानेवारी २०२६) रोजी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. पुण्याकडून सोलापूरकडे जाणाऱ्या केमिकल टँकरने मोटरसायकलला धडक दिल्याने मोटरसायकलवरील एक पुरुष व दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला. मृतांना उपचारासाठी टेंभुर्णी येथील मार्स मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

अपघातातील केमिकल टँकर क्रमांक TS 30 T 3366 हा पुण्याकडून सोलापूरकडे जात असताना, समोरून येणाऱ्या होंडा शाईन मोटरसायकल क्रमांक MH 39 E 6778 ला वेणेगाव ब्रिजजवळ धडक दिली. टँकर चालक बरकतआली मौलाआली शेख (वय २५, रा. जळकोट, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे चालकाचे नाव आहे. मोटरसायकलवरून पंढरपूरकडून नंदुरबारकडे जाणारे मीरा राज्य भील (वय ३८), पायल मीरा भील (वय १५) व खारकी मीरा भील (वय २६, सर्व रा. कोटबंधनी, पोस्ट रायपूर, ता. शहादा, जि. नंदुरबार) हे वेणेगाव फाट्याजवळ महामार्ग ओलांडत असताना अपघात घडला. अपघातात तिघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना खासगी रुग्णवाहिकेद्वारे टेंभुर्णी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले;

मात्र डॉक्टरांनी तिघांनाही मृत घोषित केले. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तसं तपास पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. जगताप तपास करी

# नेताजी प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** हुतात्मा स्मृती मंदिर येथे नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. प्रमुख अतिथी शेळगी केंद्राचे केंद्रप्रमुख चंद्रकांत वाघमारे, सेवानिवृत्त प्राचार्य रेवणसिद्ध रोडगीकर , सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, माजी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मीकांत त्रिशूले, धर्मराज बळ्ळारी, नेताजी महाविद्यालयाचे प्राचार्य रविशंकर कुंभार, राजराजेश्वरी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार,माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, माता पालक संघाच्या सदस्या भाग्यश्री बंदलगी, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष संतोष पुजारी आदी उपस्थित होते.

प्रथम मान्यवरांच्या हस्ते वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन व रंगमंचाचे पूजन करुन स्नेहसंमेलनाचे उदघाटन करण्यात आले.

मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांनी अहवाल वाचनात शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला व पालकांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.संस्था अध्यक्ष कुंभार म्हणाले, स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कला,कौशल्य व आत्मविश्वासाला नवे बळ मिळते. भविष्यात ही शाळेने गुणवत्तेचा दीप उजळवत समाजाला सक्षम पिढी देत राहावी.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी गणपती गीत, नवीन वर्षाच्या स्वागताचे गीत, कोळीगीत देशभक्तीपर गीत,ऑपरेशन सिंदूर, शेतकरी गीत अशा गाण्यावर बहारदार नृत्य सादर करुन पालक प्रेक्षकांना भारावून टाकले. बालवाडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या उत्तम नृत्य अविष्काराने पालक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक प्रशांत बत्तुल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषदेमध्ये जिजाऊ सावित्रीच्या लेकींचा होणार सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखेच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती निमीत्त दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10.00 वा. यशवंत चव्हाण सभागृह जिल्हा परिषद सोलापूर येथे मा मुख्य कार्यकारी श्री कुलदीप जंगम यांचे शुभहस्ते व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक श्री चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र) श्रीमती स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्रीमती मिनाक्षी वाकडे यांचे प्रमुख उपस्थितीत व सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष उपस्थितीत जिल्हा परिषदेत जिजाऊ सावित्रीच्या लेंकिंचा कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान करण्यांत येणार आहे असे मराठा सेवा संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी सांगीतले त्यात प्रामुख्याने मालती नंदकुमार कोहिणकर, उषा उत्तमराव जगताप, छाया महादेव पाटील, वनमाला महादेव भुजबळ, माया चंद्रहार जाधव, मंगला यशवंत मिरकले, कल्पना तानाजी वाकडे, सुदामती नागनाथ जगताप, प्रभावती गोविंद नवले, नंदाबाई शिवाजी हावळे, कलावती भरत धनशेट्टी,बायडाबाई सुभाष कवितके, सविता तानाजी कदम, वनिता विजय जमदाडे,चंद्रभागा भगवान पांढरे, कुसूम जनार्दन कुलकर्णी,लियाकत नैनुद्दीन शेख, सुनिता बापूराव राऊत यांचा सन्मान करण्यांत येणार आहे. तसेच सकाळी 10 ते 5 वाजेपर्यत रक्तदान शिबीराचे पण आयोजन केले आहे.

याप्रसंगी अनिल जगताप, सचिन साळुंखे, सुर्यकांत मोहिते, सुहास चेळेकर,आप्पासाहेब भोसल, सचिन चव्हाण, चेतन भोसले, विकास भांगे,रोहीत घुले, रणजित गव्हाणे. संतोष शिंदे, अनिल पाटील, वासुदेव घाडगे, सुधाकर माने देशमुख, विशाल घोगरे, अभिजीत निचळ, संतोष सातपुते, भूषण काळे,उमेश खंडागळे, प्रकाश शेंडगे, मनोज साठे, गोपाल शिंदे, संजय पाटील, रविंद्र शेंडगे, महेंद्र माने, सुभाष तनमोर, शशि साळुंखे, विठ्ठल मलपे, त्रषिकेष जाधव, जयंत पाटील आदि उपस्थित होते.